तलाक
समज–गैरसमज

लेखक
गुलाम रसूल देशमुख

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

पार्श्वभूमी

सध्या 'तलाक' हा चर्चेचा व वादाचा विषय बनला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, मुस्लिमेतर तर सोडाच स्वतः मुस्लिम समाजाचे बहुसंख्य लोकसुद्धा तलाक म्हणजे काय? त्याचा उपयोग केव्हा, कशासाठी व कोणत्या पद्धतीने करावा याविषयी अनभिज्ञ आहेत. प्रसारमाध्यमे हेतूपुरस्सर व अज्ञानामुळे चुकीचे चित्र रंगवून इस्लामी शरियत व धर्मशास्त्राला लक्ष्य बनवून त्याला विकृत स्वरूप देत असतात. तलाकबाबत अनेक मुस्लिमांना वास्तविकतेचे ज्ञान नसल्यामुळे ते त्याचा अवैधरित्या दुरूपयोग करतात व प्रसारमाध्यमांना आयतेच खाद्य पुरवतात. यास्तव प्रस्तुत लेखात तलाकवर सोप्या व सरळ भाषेत प्रकाश टाकण्यात आला आहे.

तलाकचा अर्थ

'तलाक' हा शरियतमधील पारिभाषिक शब्द असून त्याचा अर्थ पतीने पत्नीला आपल्या विवाह बंधनातून मुक्त करणे होय. इस्लामने वैवाहिक संबंधाना सुदृढ व टिकाऊ बनविण्यासाठी अत्यंत स्पष्ट आदेश दिलेले आहेत. परंतु काही वेळा हे नाते कायम राहणे प्रापंचिक बिघाडास कारणीभूत ठरते. म्हणून तलाकची संमती देण्यात आली आहे. कारण केवळ एवढेच की पती-पत्नीला वैवाहिक जीवन असह्य होऊन कटू जीवन जगल्यासारखे वाटू नये. इस्लामने आपल्या कौटुंबिक कायद्यात तलाकचे प्रयोजन सवलत म्हणून प्रदान केलेले असले तरी त्यास एक अत्यंत अप्रिय बाब ठरविले आहे.

वैवाहिक जीवनातील कटुता व कारणे

वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये अनेकदा विविध कारणास्तव वाद निर्माण होतात. परस्परातील शंकाकुशंकाचे पर्यावसान आपसातील संघर्षात होते. एकत्रित कुटुंबव्यवस्था, घरातील वातावरण, स्वभावातील भिन्नता, दुराचार, संकुचित दृष्टिकोन, मादक पदार्थांचे सेवन, जीवनात आदर्श इस्लामी नीतीमूल्यांचा अभाव इ. अनेक कारणांमुळे कौटुंबिक वातावरण बिघडते. मृत्यू अटळ आहे आणि जीवनातील प्रत्येक कर्माविषयी मृत्युपश्चात अल्लाहसमोर जाब द्यावा लागेल या इस्लामच्या मूलभूत शिकवणींचा विसर पडल्यामुळे पती-पत्नीतील हे वाद विकोपाला जातात. वैवाहिक जीवनात कलहाची स्थिती निर्माण होऊन त्याचा शेवट 'तलाक'वर होतो. कुटुंबव्यवस्था अधिकाधिक निकोप करण्यासाठी व दांपत्यिक समस्यांच्या निवारणार्थ इस्लामने यथायोग्य मार्गदर्शन केले आहे.

कुरआनचे मार्गदर्शन

"त्या (तुमच्या पत्नी) 'तुमच्यासाठी पोषाख आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी पोषाख आहात." (दिव्य कुरआन, २ :१८७)

"आणि त्याने (अल्लाहने) तुमच्या दरम्यान (पती-पत्नींमध्ये) प्रेम आणि करूणा उत्पन्न

केली."

(दिव्य कुरआन)

"त्यांच्याशी (पत्नीसोबत) चांगल्या प्रकारे जीवन व्यतीत करा. जर त्या तुम्हाला आवडत नसतील तर शक्यता आहे की, एखादी गोष्ट तुम्हाला पसंत नसेल परंतु अल्लाहने त्यांच्यात बरेच काही भले गुण ठेवले असतील जे तुम्हाला लाभदायक असू शकतील."

(दिव्य कुरआन, ४:१९)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा आदेश

"पतीने आपल्या पत्नीचा तिरस्कार करू नये. जर तिची एखादी सवय तुम्हास प्रिय नसेल तर अन्य सवयी पसंत असू शकतील." (हदीस : मुस्लिम)

ही वास्तवता आहे की, सामान्यतः स्त्रिया भावनाप्रधान असतात. त्यामुळे त्या अतिशिघ्रतेने गैरसमज करून घेतात. या कारणाने अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा स्थितीत पुरुषांनी संयम आणि विवेकाचा परिचय दिला पाहिजे. आपसात गुंतागुंत व पेचप्रसंग निर्माण होईल असे वर्तन कदापि करू नये.

पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण

"श्रद्धावंतापैकी परिपूर्ण श्रद्धावंत तोच होय ज्याचे चारित्र्य चांगले असावे आणि तुम्हांपैकी उत्तम तोच आहे जो आपल्या पत्नीशी सत्याने व चांगले वागतो." (हदीस)

जेव्हा पती-पत्नींमध्ये परस्परांविषयी संशय व तक्रारीची भरमसाठ वृद्धी होऊन एकमेकांबद्दल द्वेष निर्माण झाला असेल तर अशा परिस्थितीत इस्लामने दोहोंत सुधारणा व समेट घडवून आणण्याच्या उद्देशाने काही उपाय व युक्त्या प्रयुक्त्याची शिकवण दिली आहे.

परस्परांतील मतभेद आणि कुरआनचे मार्गदर्शन

"ज्या स्त्रियांकडून तुम्हाला असभ्य वर्तनाचे भय असेल त्यांची योग्य प्रकारे समजूत घालावी. शयनगृहात त्यांच्यापासून अलिप्त राहावे आणि गरज पडल्यास त्यांना मार द्यावा आणि मग त्या तुमच्या आज्ञाधारक बनल्या तर विनाकारण त्यांच्यावर हात उगारण्याचे निमित्त शोधू नका. त्यांच्यावर कुठलाही अन्याय, अत्याचार करू नका. विश्वास बाळगा, सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्वत्र हजर आहे. तोच उच्चतम व महान आहे." (दिव्य कुरआन, ४ : ३४)

उपरोक्त आयतींमध्ये पतीला पत्नीच्या अवज्ञावृत्तीच्या सुधारणेसाठी तीन उपाय सुचविण्यात आले आहेत. ते असे-

१) प्रथमतः तिची समजूत घालावी. जर प्रतिसाद दिला नाही तर,

२) शयनगृहात तिला एकटे सोडावे. दोघांनी एकमेकांपासून अलिप्त रहावे ज्याअन्वये पतीच्या नाराजीची पत्नीला कल्पना येईल. याचा सदुपयोग झाला नाही तर,

३) शिक्षा म्हणून पती आपल्या पत्नीला मार देऊ शकतो.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे हदीसवचन आहे, *"पत्नीच्या मुखावर मारू नका आणि*

तिला शिवीगाळ करू नका." (हदीस : अबू दाऊद)

वरनिर्दिष्ठ तिन्ही उपायांचा कोणताही परिणाम झाला नसेल आणि सुधारणा होण्याची लक्षणे दिसत नसतील तर कुरआनच्या पुढील मार्गदर्शनाचा अवलंब करण्यात यावा.

"जर पती-पत्नीमध्ये बेबनाव, वितुष्टाचे भय वाटत असेल तर पतीच्या संबंधितांपैकी एक मध्यस्थ आणि पत्नीच्या संबंधितांपैकी एक मध्यस्थ नियुक्त करावा. जर ते दोघे समझोता घडवून आणू इच्छित असतील तर अल्लाह उभय पती-पत्नीमध्ये समेटासाठी अनुकूलता निर्माण करील. अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि प्रत्येक गोष्टीची खबर बाळगणारा आहे."

(दिव्य कुरआन,४:३५)

अर्थात पती आणि पत्नी या दोहोंच्या परिवारातर्फे एकेक मध्यस्थ सामोपचारासाठी नियुक्त करण्यात आला तर शक्यता आहे अल्लाह सहमती व सलोख्याचा मार्ग प्रशस्त करील. कोर्ट-कचेरी करण्यापेक्षा दोघांसाठी ही पद्धत उत्तम आहे. त्यामुळे पती-पत्नींचे गुणदोष चव्हाट्यावर येणार नाहीत व समेटाची संभावना प्रबळ होईल. परंतु तलाकशिवाय कोणताही पर्याय उरला नाही तर शेवटचा उपाय म्हणून त्याचा अवलंब करावा.

पहिला तलाक

सगळे प्रयत्न निष्फळ ठरले व पती-पत्नींमध्ये परस्परात सामंजस्य निर्माण होऊन समेटाची चिन्हे दिसत नसल्यास नाइलाजास्तव पहिला तलाक हाच अंतिम उपाय शिल्लक राहतो. परंतु हा निर्णय घेताना इस्लामी शरियतच्या नियमांचा पूर्णत: अवलंब केला पाहिजे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, *"अल्लाहजवळ त्याने विहित (हलाल) केलेल्या सकल बाबींमध्ये सर्वाधिक अप्रिय गोष्ट तलाक आहे."* (हदीस : अबू दाऊद)

तलाकसंबंधी अल्लाहचा आदेश आहे,

"हे पैगंबर मुहम्मद (स.), (लोकांना सांगा की) स्त्रियांना तलाक देताना इद्दत (प्रतिक्षाकाळ) चे अनुपालन करा." (दिव्य कुरआन,६५: १)

'इद्दत' म्हणजे प्रतिक्षाकाळाचा कालावधी

तलाकविषयी कुरआनच्या सुस्पष्ट आज्ञेचा उद्देश असा की, पत्नीस मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक देऊ नये. ते अवैध असून इस्लामी धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. मासिक पाळी संपल्यावर जेव्हा ती पवित्र होते, त्यावेळी तिच्याशी समागम न करता एक तलाक दिला पाहिजे. असा एक तलाक दिल्यानंतर लगेच तो लागू होत नाही. कारण त्याच्या प्रतिक्षाकाळाचा कालावधी तलाक नंतर तीन मासिक पाळ्या ठरविण्यात आल्या आहे. याच कालमर्यादेस 'इद्दत' म्हणतात. या काळात एखादी स्त्री गरोदर असेल तर त्याचे ज्ञान प्राप्त होते आणि कोणत्याही प्रकारच्या संशयास वाव मिळत नाही. त्याचप्रमाणे वैवाहिक संबंधाचा योग्य आदर राखून पतीला आपल्या तलाकच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची संधी प्राप्त होत असते. प्रतिक्षाकाळाच्या कालमर्यादेचे गणित मासिक पाळीने सुलभ होते त्यात कोणत्याही

तऱ्हेची गुंतागुंत उत्पन्न होत नाही.

तलाक देण्याचे नियम व कायदे

तलाक देताना पतीने आपल्या पत्नीला उद्देशून उच्चारावे की, 'मी तुला एक तलाक देत आहे!' तलाक हा शरियतप्रमाणे एकावेळेस एकच द्यावयाचा असतो. तलाक देताना दोन न्यायप्रिय आणि सदाचारी इसमांना साक्षीदार ठेऊन त्यांच्यासमोरच तो दिला गेला पाहिजे.

याबाबत कुरआनचे मार्गदर्शन आहे,

''आपल्यापैकी दोन न्यायप्रिय आणि सदाचारी व्यक्तींना साक्षीदार बनवून तलाक हा तोंडी आणि लेखी स्वरूपात दिला गेला पाहिजे.'' (दिव्य कुरआन)

अशा तऱ्हेने तलाक देताना आणि लिहिताना एक तलाक दिला असे स्पष्टपणे नमूद करावे. लिखित कागदावर पती व दोन साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत. प्रथम तलाकनंतर पत्नीने इद्दत अर्थात प्रतिक्षाकाळाच्या कालावधीपर्यंत पतीच्या घरातच वास्तव्यास राहणे इस्लामी शरियतने अनिवार्य ठरविले आहे. तलाक दिल्यावर इद्दतच्या कालावधीपर्यंत पतीने पत्नीला घरात सन्मानपूर्वक निवासाची संधी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. यावेळी पत्नीच्या सर्व गरजा पूर्ण करणे त्याचे नैतिक कर्तव्य ठरते. या काळात पती-पत्नींमध्ये मनोमीलन होऊन सामोपचाराचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात यावा. विशेष म्हणजे या प्रलंबित वेळेत पतीला त्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची संधी प्राप्त होते. त्याचा लाभ त्याने अवश्य घेतला पाहिजे. परिणामतः त्याचा संसार उद्धवस्त होण्याऐवजी सुरक्षित राहू शकतो.

अल्लाहचा आदेश आहे,

''ज्या स्त्रियांना तलाक देण्यात आला आहे त्यांनी स्वतःला तीन मासिक पाळीपर्यंत रोखून ठेवावे.'' (दिव्य कुरआन, २ :२२८)

अशा तऱ्हेने तिसरी मासिक पाळी संपल्यावर स्त्रिच्या प्रतिक्षाकाळाची मुदत पूर्ण होते. मासिक पाळी न येणाऱ्या स्त्रियांसाठी प्रतिक्षाकालावधी तीन महिन्यांचा आहे. एखादी स्त्री गरोदर असल्यास तिचा प्रतिक्षाकाळ तिचे बाळंतपण होईपर्यंत अथवा नैसर्गिकपणे गर्भमुक्त होईपर्यंत असतो. यासंबंधी कुरआनात उल्लेख आहे,

''गर्भवती स्त्रियांच्या प्रतिक्षाकाळाची मर्यादा त्यांच्या गर्भमुक्तीपर्यंत आहे.''

(दिव्य कुरआन,६५: ४)

पहिल्या तलाकनंतर प्रतिक्षाकाळाच्या मर्यादेच्या आत म्हणजेच तीन मासिक पाळ्या येईपर्यंत दोहोंची आपसात तडजोड झाली, त्यांच्यातील तक्रारींचे निरसन होऊन संघर्ष संपुष्टात आल्यास ते पुनःश्च एकत्र राहून वैवाहिक जीवन जगू शकतात. अशा वेळी दोघांमध्ये समझोता झाल्याची व संमतीची नोंद लिखित स्वरूपात दोन प्रतिष्ठित व नितिमान साक्षीदार ठेऊन त्यांच्या समक्ष करावी. त्या करारपत्रावर दोन्ही साक्षीदार आणि पती-पत्नींचीदेखील स्वाक्षरी घेण्यात

यावी.

जर प्रतिक्षाकाळाच्या मर्यादेत पतीपत्नींमध्ये समेट झाला नाही किंवा तडजोड होऊन सलोखा कायम करण्यात यश आले नाही तर इद्दतचा कालावधी संपल्यानंतर त्याचा तलाक होऊन ते दोघे विभक्त होतील. आता ते स्वतंत्र आहेत. त्यांनी आपल्या इच्छेनुसार पुढील जीवन व्यतीत करावे. अशा स्थितीत पतीचा पत्नीवर कोणताही अधिकार राहत नाही आणि पती-पत्नी केवळ एका तलाकने विभक्त होतात.

एक पर्याय असा आहे की, पती-पत्नी विभक्त झाल्यावर कालांतराने त्यांना पश्चात्ताप होऊन ते दोघे आपसात तडजोड करून पुन:श्च एकत्र येऊन संसार करण्यासाठी तयार झाले तर, अशा वेळी मात्र त्यांना पुनर्विवाह करावा लागेल. अशारितीने ते विवाहबद्ध होऊन नव्याने वैवाहिक जीवनाचा आनंद व उपभोग घेऊ शकतात.

वरील दोन्ही परिस्थितीत शरियतनुसार फक्त एकच तलाक गणला जाईल. इस्लामी शरियत आणि धर्मशास्त्रानुसार तलाकची प्रस्तुत पद्धत योग्य आणि कायदेशीर आहे. प्रतिक्षाकाळाच्या दरम्यान पती-पत्नीला पूर्णपणे गांभीर्याने विचार करण्याचा अवधी मिळतो. त्यांना स्थिती जाणून घेण्याची संधी लाभते. तसेच पत्नीलासुद्धा आपल्या चुका सुधारण्याचा पुरेपूर वेळ मिळतो. दोघांसाठी हा कालावधी भविष्यात पश्चात्तापाची वेळ येऊ नये याची संधी उपलब्ध करून देतो.

दुसरा तलाक

पहिल्या तलाकनंतर पतीने पत्नीशी समेट केला व दोघे एकत्र नांदू लागले किंवा प्रतिक्षाकाळ निघून गेल्यावर दोघांनी तडजोड करून पुनर्विवाहाद्वारे दांपत्यिक जीवन जगण्यास प्रारंभ केला, परंतु काही काळ लोटल्यानंतर त्यांच्या दरम्यान पुनश्च काही समस्या, तक्रारी व भांडणे निर्माण झाली आणि पहिल्यासारखाच प्रसंग उद्भवला तर, अशा वेळी उपरोक्तप्रमाणे सर्वतोपरि प्रयत्नांची पराकाष्ठा करूनसुद्धा समेट झाला नाही आणि पुन्हा तलाक देण्याची वेळ येऊन ठेपली तर आता पती दुसरा तलाक देऊ शकतो. या दुसऱ्या तलाकच्या वेळीदेखील दोन न्यायप्रिय व सदाचारी व्यक्तीसमोर त्यांच्या साक्षीने दुसरा तलाक दिला गेला पाहिजे, लेखी दस्तऐवजावर पती-पत्नी आणि दोन्ही साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या पाहिजेत.

दुसऱ्या तलाकनंतरसुद्धा पत्नीला पहिल्याप्रमाणेच प्रतिक्षाकाळाचा कालावधी अनिवार्य म्हणून पतीच्या घरातच घालवावा लागेल. याप्रसंगी पत्नीच्या सगळ्या गरजा भागविणे बंधनकारक आहे. या काळात दोघांना परस्परातील गैरसमज व गाऱ्हाण्यांचे निवारण करून सामोपचार घडवून आणण्याची संधी असते. समेट झाला नाही आणि इद्दतचा अवधी संपला तर ते दोघे एकमेकांपासून विवाहबंधनातून मुक्त होतील. प्रतिक्षाकाळानंतर ते दोघे सहजीवनास राजी होऊन दांपत्यिक आयुष्य जगण्यास सहमत झाल्यावर मात्र त्यांना रीतसर पुनर्विवाह करावा लागेल.

थोडक्यात, प्रथम आणि दुसऱ्या तलाकमध्ये पती-पत्नीला एकमेकांबरोबर तडजोड

करून पुन:श्च संबंध प्रस्थापित करण्याची संधी असते. इद्दतनंतर वैधरीत्या पुनर्विवाहाद्वारे पुन्हा वैवाहिक जीवन जगण्याचा अवसर उपलब्ध होतो. अशा वेळी पत्नीवर दोन तलाक होतील.

तिसरा तलाक

पवित्र कुरआनात ईशआज्ञा आहे,

"तलाक केवळ दोन होय, नंतर त्यांना एकतर सर्वसंमत पद्धतीने आपल्या स्वत:जवळ ठेऊन घ्या किंवा त्यांना सन्मानपूर्वक निरोप द्या." (दिव्य कुरआन, २:२२९)

आपणास ज्ञात आहे की, प्रथम तलाक दिल्यानंतर पती आपल्या पत्नीशी पुन:श्च संबंध प्रस्थापित करू शकतो. त्याचप्रमाणे दुसरा तलाक दिल्यावरसुद्धा संबंध पुनर्स्थापित करण्याची त्याला संधी मिळते. परंतु त्याने तिसरा तलाक दिल्यानंतर मात्र त्याला पुन्हा नाते जोडण्याची अजिबात संधी राहत नाही. हा तिसरा अंतिम तलाकदेखील अगोदरच्या दोन तलाकांप्रमाणे तोंडी व लेखी स्वरूपात असावा. दोन न्यायप्रिय व सदाचारी व्यक्तींसमोर तलाक देऊन त्यांची साक्षीदार म्हणून दस्तऐवजावर स्वाक्षरी घेतली पाहिजे. त्याचबरोबर पतीनेसुद्धा स्वाक्षरी केली पाहिजे. आता हे दोघे पती व पत्नी कायमस्वरूपी विवाहबंधनातून मुक्त होतील. तिसरा तलाक दिल्यावर इद्दतच्या कालावधीचा प्रश्नच राहत नाही. आता तिला सन्मानपूर्वक निरोप देणेच अनिवार्य आहे.

एक पर्याय (कुरआनात अल्लाहचे मार्गदर्शन)

"नंतर जर दोनदा तलाक दिल्यावर पतीने आपल्या पत्नीला तिसऱ्यांदा तलाक दिला तर ती पत्नी त्याच्यासाठी वैध राहणार नाही. जोपर्यंत तिचा दुसऱ्या पुरुषाबरोबर विवाह होऊन तो तिला तलाक देईल (किंवा ती विधवा होईल). तद्‌वतच पहिल्या पतीला आणि स्त्रीला असे वाटत असेल की, अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादांचे आपण पालन करू शकू तरच त्यांना पुन:श्च विवाहबद्ध होऊन नव्याने वैवाहिक जीवन जगता येईल." (दिव्य कुरआन, २:२३०)

साधारणत: लोक अज्ञानामुळे व नादानपणामुळे काही एक विचार न करता क्रोधाग्नीच्या आवेशात एक तलाक न देता तीन तलाक देऊन टाकतात. वकील आणि कायदेतज्ञसुद्धा तलाकचे दस्तऐवज तयार करताना तीन वेळा तलाक, तलाक, तलाक असे शब्द लिहितात. काजी व धर्मपंडितसुद्धा त्यांच्या अर्धवट ज्ञानामुळे विकृत परंपरेनुसार अनिवार्य समजून तलाक शब्द तीन वेळा उच्चारला व लिहिला जावा असा कटाक्ष पाळतात. हे सगळेकाही पार पाडताना संबंधिताना महरची रक्कम दिली गेली आहे किंवा नाही, त्याचबरोबर अन्य सामाजिक दायित्वाचे कर्तव्य बजावताना शरियतद्वारा विहित नियमांची परिपूर्तता होते अथवा नाही याचा पुसटसाही विचार हे महाभाग करीत नाहीत.

संतापाच्या भरात वरीलप्रमाणे तलाक दिल्यावर राग शमल्यानंतर पतीला आपल्या चुकीच्या कृत्याचा पश्चात्ताप होतो. मग ते धर्मपडितांकडे हेलपाटे मारू लागतात. अशा वेळी हे धर्ममार्तंड त्यांना 'हलाला' करण्याचा सल्ला देतात. तो असा की, पत्नीने पूर्वनियोजितपणे

(त्वरीत तलाक देण्याच्या अटीवर) कृत्रिमरित्या एखाद्या पुरुषाशी नाममात्र विवाह लावून त्वरीत तलाक घेऊन स्वत:ला विभक्त करून घ्यावे. ज्यामुळे पहिल्या पतीसोबत तिच्या विवाहाचा मार्ग मोकळा होईल. असे निर्बुद्धपणा व बेगडीपणाचे कृत्य करताना या लोकांना कळत नाही की आपण काय करीत आहोत. केवळ स्वार्थांध होऊन अज्ञानाचे असंवेदनशील वर्तन ते करतात. विशेष म्हणजे तथाकथित धार्मिक विद्वान त्यांना उपदेश करून या अपराधी कृत्यासाठी उद्युक्त करतात. 'हलाला' करण्याच्या या सर्वथा अनुचित पद्धतीचा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तीव्र धिक्कार केला आहे.

पैगंबर मुहम्मद (स) यांचा उपदेश

''अल्लाहने हलाला (वैध) करणारे आणि तो करवून घेणारे अशा दोहोंचा धिक्कार केला आहे.'' (हदीस : तिर्मिजी)

''दुसऱ्या एका प्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) आपल्या सोबत्यांना विचारतात की, ''काय मी तुम्हाला दाखवू भाड्याचा सांड कोण आहे?'' अनुयायांनी अग्रहपूर्वक उत्तराची अपेक्षा व्यक्त केली. पैगंबर उद्‌गारले, ''तो आहे, हलाला (वैध) करणारा! अल्लाहचा धिक्कार आहे हलाला करणाऱ्यांवर आणि त्यांच्यावर ज्यांच्यासाठी हलाला केला जातो.''

(हदीस : इब्ने माजा)

अशा तऱ्हेने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उपरोक्त दोन्ही उपदेशांवरून स्पष्ट होते की, हलालाची सदरहु पद्धत इस्लामी शरियत व धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. ते अनैतिक, निर्लज्जतेचे व अनैसर्गिक दुष्कृत्य आहे. लोकांना अशाप्रकारे सल्ला देणाऱ्या महाभागांची कीव करावीशी वाटते.

वर निर्दिष्ट कुरआनच्या आदेशाचा उद्देश असा आहे की, एखाद्या तलाकपीडित स्त्रीने स्वेच्छेने दुसऱ्या पुरुषाशी रीतसर विवाह केला व आता या पतीनेही तिला तलाक दिला अथवा ती विधवा झाली तर अशा परिस्थितीत पहिला पती व पत्नी समझोता झाला तर तो तिच्याशी पुन:श्च विवाह करू शकतो.

पत्नीला निरोप देण्याचे नियम

तिसरा तलाक झाल्यानंतर पतीने आपल्या पत्नीला आदरपूर्वक निरोप दिला पाहिजे. विवाहप्रसंगी व तद्‌नंतर वैवाहिक जीवनात तिला दिलेल्या वस्तू परत घेणे किंवा तशी मागणी करणेसुद्धा सर्वथा चुकीचे आणि अवैध आहे. ज्या पत्नीशी प्रेमसंबंध होते तिला निरोप द्यावयाचा आहे. ती तुमची अर्धांगिनी राहिली आहे. तेव्हा तुमच्या पुरूषार्थाला साजेसाच निरोप द्यावयास हवा.

कुरआनात अल्लाहची शिकवण

''आणि हे तुमच्यासाठी कदापि उचित नाही की, जे काही तुम्ही त्यांना दिलेले आहे त्यातून काही परत घ्यावे.'' (दिव्य कुरआन, २:२२९)

अर्थात 'महरची' रक्कम, आभूषणे, कपडेवस्त्र आदि ज्या काही वस्तू पतीने पत्नीला भेट स्वरूपात दिल्या असतील त्यापैकी काही एक जिन्नस माघारी मागण्याचा पतीला अधिकार व हक्क नाही. ही बाब इस्लामी नीतीमूल्यांविरुद्ध आहे की, आपण एखादी सस्नेह भेट म्हणून दिलेली वस्तू परत मागावी. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अशा प्रकारच्या दुष्कर्मास 'कुत्र्याचे चाळे' संबोधिले आहे. ज्याप्रमाणे कुत्रा ओकारी करून पुन्हा ते चाटत असतो त्यासमान प्रस्तुत कृत्य असून पतीसाठी अत्यंत घृणास्पद होय. या उलट इस्लामी शरियत व धर्मशास्त्र तलाकनंतर निरोप देताना पतीला आज्ञा करतो, की त्याने आपल्या ऐपतीनुसार यथायोग्य प्रकारे काही न काही प्रदान करूनच निरोप द्यावा.

कुरआनात अल्लाहचा उपदेश

''याचप्रमाणे ज्या स्त्रियांना तलाक दिला गेला असेल त्यांनासुद्धा काही न काही (स्वत:च्या ऐपतीप्रमाणे) देऊन निरोप देण्यात यावा. हा हक्क आहे ईशभय बाळगणाऱ्या लोकांवर.''

(दिव्य कुरआन, २:२४१)

तलाकपीडित आणि विधवांची समस्या

इस्लामी शरियत आणि धर्मशास्त्रात एकापेक्षा अधिक अर्थात चारपर्यंत विवाह करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात आणि तद्नंतरच्या कालावधीत तलाकपीडित व विधवा स्त्रियांच्या समस्या उद्भवल्या नव्हत्या. कारण अशा प्रकारच्या स्त्रियांचे सहजगत्या व तत्परतेने विवाह जुळत असत. आजदेखील जगात इस्लामी देशात याची अंमलबजावणी होत असल्यामुळे तेथे अशा समस्या निर्माण झालेल्या नाहीत. परंतु विद्यमान आधुनिक युगात आणि विशेषत: भारतीय समाजात त्याची संमती नसल्यामुळे तलाकपीडित व विधवा स्त्रियांचा प्रश्न फारच गंभीर बनला आहे.

आमच्या देशात कायद्याने एकापेक्षा अधिक विवाह करण्यास बंदी आहे व मुस्लिमेतर समाजात तो फौजदारी अपराध ठरतो. पण रखेल आणि अवैध संबंध ठेवण्यास मात्र बंधन नाही. त्या कितीही मर्यादेपर्यंत असू शकतात. तसेच मनात येईल तेव्हा त्यांना सोडून देता येते. त्यांची कुठल्याही नैतिक व कायदेशीर जबाबदारी पुरुषांवर नसते. त्यामुळे पुरुषवर्ग त्यांचे मनसोक्त, स्वैरपणे शोषण करू शकतात. परंतु अशा स्त्रियांची व त्यांच्यापासून जन्मणाऱ्या संततीची जबाबदारी पार पाडण्याची कायद्यात कोणतीच तरतूद नाही. पुरुषवर्गसुद्धा लैंगिक भूक भागविण्यापलीकडे कोणत्याही तऱ्हेचे दायित्व स्वीकारण्यास तत्पर नसतात. परिणामत: अशा अबलांना संरक्षण प्रदान करणारा कुणी वाली उरत नाही.

इस्लामी धर्मशास्त्राचे पालन

तलाकच्या अनुषंगाने इस्लामी शरियत आणि धर्मशास्त्राने जे आदेश, नियमावली, अटी व शर्ती आणि निर्बंध निर्धारित केले आहेत, त्यांचे तंतोतंत पालन केल्यास समाजात तलाक एक अपवादात्मक कृत्य होईल. मग तलाक देण्याचा दुर्दैवी प्रसंग कदापि उद्भवणार

नाही. यास्तव अनिवार्य आहे की इस्लामी शरियतच्या तलाकविषयी नियमांचे, अटींचे आणि पध्दतीचे व्याख्यानातून, चर्चासत्रातून किंवा प्रार्थनासभांमध्ये व शुक्रवारच्या प्रवचनांतून जनप्रबोधन करण्यात यावे. त्यामुळे लोकांना त्याबाबतचे वास्तविक सत्याधिष्ठित ज्ञान प्राप्त होईल. परिणामत: समाजात तलाक देणाऱ्यांची संख्या नगण्य होईल.

'खुलअ'ची परिभाषा आणि नियम

इस्लामी शरियतने ज्याप्रमाणे पतीला अपरिहार्य परिस्थितीत 'तलाक'चा अधिकार दिला आहे, त्याचप्रमाणे पत्नीलासुद्धा अपरिहार्य परिस्थितीत 'खुलअ'चा अर्थात पतीपासून सुटका प्राप्त करून घेण्याचा अधिकार बहाल केला आहे. पती दुराचारी असेल, सातत्याने अन्याय-अत्याचार करत असेल, शरियतने विहित केलेल्या हक्कांची पायमल्ली करत असेल, नांदवतही नाही आणि सोडतही नाही अशी स्थिती असेल व सहजीवनाची सुतराम शक्यता नसेल, सर्वतोपरि प्रयत्न करूनही त्याच्या आचरणात बदल होत नसेल तर अशा वेळी पतीकडून सुटका करून घेण्याचा पत्नीचा अधिकार म्हणजे 'खुलअ' होय.

'खुलअ'विषयी कुरआनचे मार्गदर्शन

''आणि तुमच्यासाठी हे उचित (वैध) नाही की जे काही तुम्ही त्यांना दिले आहे त्यातून काहीही परत घ्यावे. याला अपवाद केवळ इतकाच आहे की जर पती-पत्नीला असे भय वाटत असेल की आपण अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादेत राहू शकणार नाही अशावेळी पत्नीने काही मोबदला देऊन विवाह बंधनातून सुटका करून घेण्यास काही हरकत नाही.''

(दिव्य कुरआन, २:२२९)

कुरआनच्या उपरोक्त आयतीचा तपशील असा

जेव्हा अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन होण्याची दाट भीती वाटत असेल अशा अवस्थेत 'खुलअ' हाच उपाय असतो. तलाक जशी अनिष्ट बाब आहे. त्याचप्रमाणे 'खुलअ'सुद्धा अत्यंत वाईट गोष्ट होय. परंतु ईशआज्ञेचा अव्हेर टाळण्यासाठी 'खुलअ' अपरिहार्य ठरतो.

तलाक दिल्यावर पत्नीकडून तिला दिलेल्या धनसंपत्ती आदींपैकी काहीसुद्धा परत घेण्याचा पतीला अधिकार नाही. मात्र पत्नी जर खुलअ घेऊ इच्छित असेल अर्थात विवाह संबंधातून विमुक्त होऊ इच्छित असेल तर अशा वेळी त्या संपत्तीचा काही भाग किंवा संपूर्ण संपत्ती, 'महर'ची रक्कम इत्यादी पतीला परत देऊन ती विभक्त होऊ शकते.

'खुलअ'साठी एवढे पुरेसे आहे की, विभक्त होण्यासाठी पत्नीने संपूर्ण 'महर' अथवा त्याचा काही भाग पतीला परत करण्यास राजी असावे. तद्‌वतच पतीसुद्धा त्याचा स्वीकार करून तलाक देण्यास राजी असावा.

पत्नीने दिलेल्या मोबदल्याचा पतीने इन्कार केल्यास मात्र तिला न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. न्यायाधीशानेही (काजी) त्वरीत न्याय दिला पाहिजे. (न्यायालयाचे अस्तित्व तत्पर न्यायासाठी असते हे खरे, परंतु विद्यमान न्यायालये इतकी महागडी आहेत की,

सर्वसामान्य अबला तिकडे फिरकू शकत नाही. यदाकदाचित गेलीच तर कोर्टाचे हेलपाटे तिच्या नशिबी येतात. ऐन तारूण्यात पदार्पण करणारी युवती निम्न कोर्टातून सर्वोच्च कोर्टात पोहोचेपर्यंत वार्धक्यात पोहोचलेली असते. त्यातही न्यायासंबंधी संशयाच्या वलयात तिचे उर्वरित जीवन उद्ध्वस्त होऊन जाते.)

पुनर्विवाह

'खुलअ'मुळे विवाहबंधनातून विमुक्त झाल्यानंतर त्या स्त्रीची (पत्नी) पुन्हा त्या पहिल्या पतीबरोबर विवाह करण्याची इच्छा झाली तर ती तसे अवश्य करू शकते. पतीपत्नी दोघांची इच्छा असल्यास पुनःश्च विवाह करून एकत्र राहू शकतात.

पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण

"अल्लाहजवळ सर्व वैध (हलाल) कृत्यांपैकी तलाक अत्यंत अप्रिय कर्म आहे."

"'खुलअ'चा खेळणे म्हणून दुरूपयोग करणाऱ्या स्त्रिया 'मुनाफिक' अर्थात गुन्हेगार व पाखंडी आहेत."

"कोणत्याही तऱ्हेच्या अन्याय व अत्याचाराशिवाय एखाद्या पत्नीने आपल्या पतीपासून खुलअ घेतल्यास तिच्यावर अल्लाह, ईशदूत (फरिश्ते) आणि सर्व श्रद्धावंताकडून धिक्कार असतो."

उपरोक्त शिकवणींनुसार पती व पत्नी दोघांनी 'तलाक' अथवा 'खुलअ'चा अधिकार अपरिहार्य परिस्थितीत व अंतिम मार्ग म्हणूनच वापरला पाहिजे. केवळ क्षुल्लक कारणास्तव किंवा वासनापूर्तीसाठी 'तलाक' आणि 'खुलअ' यास शस्त्र बनवू नये.

सारांश हा की वैवाहिक नातेसंबंध चिरंतर टिकवून ठेवायचे असल्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या मर्यादांचे मनोभावे आज्ञापालन व संरक्षण करून परस्परात आपुलकी, जिव्हाळा आणि दयाभाव, करूणेचे नाते अबाधित राहिले पाहिजे. पवित्र कुरआनच्या आज्ञेनुसार ईशभिरूता (तक्वा) व सात्विकतेचा अंगीकार करावा. अशाप्रकारे गुण्या-गोविंदाने राहणे शक्य नसल्यास अंतिमतः 'तलाक' वा 'खुलअ'चा उपयोग करावा.

अर्थात जे दांपत्य एकत्रितपणे, गुण्यागोविंदाने राहू शकत नाही, त्यांच्यामध्ये मतभेद, कटुता आणि वैरभाव उत्पन्न होतो. परिणामतः एक दुसऱ्यावर दूषणे व दोषारोप होऊ लागतात. समाजात त्यांचे अवगुण चर्चेचा विषय बनतात. या समस्या आणि परिणामी होणारा विध्वंस, बिघाड संपविण्याच्या हेतूने शरियतने पतीला 'तलाक' चा आणि पत्नीला 'खुलअ'चा अधिकार प्रदान केला आहे.

-०- समाप्त -०-